# संत सावता माळी रयत बाजार

धनश्री निगडे
आचार्य पदवी विद्यार्थिनी
विस्तार शिक्षण विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

भाजीपाला म्हंटल की दररोजचा आहार पण याच भाजीपाल्याच्या किमती वाढल्या कि लगेच सर्वसामान्यांच बजेट कोलमडत अशा आशयाच्या बातम्या आपण अनेक वृत्तवाहिन्यांवर ऐकत असतो. भाजीपाल्याच्या किमती किंवा त्यांचे भाव वाढल्याने अस होत का हा खरा चिंतनाचा विषय आहे पण आज हा एक चिंतनाचा विषय बनला आहे. आज अनेक शेतकरी बांधव वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या आपल्या शेतात उत्पादित करतात. यात फक्त देशीच नव्हे तर विदेशी भाजीपाला उत्पादित करतात हि विदेशी भाजीपाला उत्पादनाची बाब त्यांनी शक्य करून दाखवली. कारण विदेशी भाजीपाल्यासाठी लागणारे हवामान यासाठी त्यांनी शेडनेटचा वापर करून हे शक्य करून दाखवले आहे. विदेशी भाजीपाला लागवडीसाठी लागणारे हवामान येथील शेतकऱ्यांनी चांगल्याप्रकारे जाणले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर भाजीपाला उत्पादित होऊन सुद्धा भाजीपाल्याच्या किमती अव्वाच्या सव्वा होताना आपण बघतो. या किमतीची चढ उतार होण्याचे कारण म्हणजे शेतकरी आणि ग्राहक यांच्या मधील साखळी. ती साखळी आपण नष्ट करू शकलो तर नक्कीच आपण शेतकऱ्यांचा आणि ग्राहकांचा फायदा करून देऊ शकतो. यामुळे शेतीमालाला योग्य भाव शेतकऱ्यांना मिळेलच पण ग्राहकांना सुद्धा योग्य दरात ताजा भाजीपाला उपलब्ध होईल. तसेच फळांच्या बाबतीत आहे. फळे हि खूप महाग आहेत असे समजले जाते. त्यामुळे दैनंदिन आहारात त्याचा उपयोग होत नाही. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि शेतकरी ते ग्राहक यांच्या मधील साखळी संपुष्टात यावी यासाठी महाराष्ट्र शासनाने संत शिरोमणी संत सावता माळी रयत बाजार हे अभियान सुरु केले आहे.

शेतकऱ्यांच्या मालाला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने नविन योजना आखली आहे. त्या माध्यमातून यातील साखळी नष्ट होऊन दोन्ही घटकाला त्याचा फायदा व्हावा असा शासनाचा मानस आहे. विकेल ते पिकेल या संकल्पनेवर आधारित कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे धोरण आहे. यापूर्वी शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला बाजारभाव हवा तसा मिळत नव्हता. त्यांचा माल व्यापारी कमी भावात विकत घेत व ग्राहकांना जास्त भावात विकत होते. परंतु या योजनेत आता शेतात पिकलेला माल त्यांच्या गावातील लोकांना थेट मिळणार आहे. या अभियानामुळे शेतकऱ्यांना आता गावातच भाजीपाला व फळे विक्री करता येणार आहे. यामुळे त्यांचा वाहतुक खर्च वाचणार आहे. तसेच गाव व परिसरातील ग्राहकांना ताजा व उत्तम प्रतीचा भाजीपाला, फळे कमी किमतीत मिळणार आहे. या धोरणाचा एक भाग म्हणून संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियानाची सुरुवात करण्यात येत आहे.

शेतकरी ते विक्री याबाबत एक चांगली व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने आता पाऊल उचलले आहे. बाजारामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगला बाजार भाव, ग्राहकांना ताजी फळे, भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध होईल अशी दुहेरी संकल्पना राज्यात सुरु करण्यात आली आहे. तालुक्याच्या ठिकाणी कृषी अधिकाऱ्याकडे पुरवठा साखळी कार्यरत राहण्यासाठी व ग्राहकांच्या मागणीप्रमाणे पुरवठा होण्यासाठी या अभियानात थेट विक्रीसाठी इच्छा व्यक्त करणाऱ्याची नोंदणी करण्यात येते. शेतकऱ्यांचे लागवड क्षेत्र, वन निवड, निविष्ठा वापराबाबत व बाजारात असलेल्या मागणीबाबत जागृती करण्याचे महत्वाचे काम कृषी विभागाकडे देण्यात आले आहे. फळे, भाजीपाला व इतर शेतीमाल उत्पादित झाल्यानंतर संबधित शेतकऱ्यांमध्ये शेतीमालाची स्वच्छता व प्रतवारी करणे, ग्रेडिंग करणे, पॅकिंग करणे, विक्री व्यवस्थापन याबाबत तांत्रिक प्रशिक्षणाची सोयही करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या ठिकाणी विक्रीच्या जागा निश्चित करून स्टॉल लावण्याचे तारखा व वेळापत्रक अंतिम करण्यात येणार असून, जास्तीत जास्त प्रतिसाद या अभियानाला मिळेल यासाठी शासनाने कृषी विभागाकडे हि जबाबदारी सोपवली आहे.

**अशी असेल योजना:** तालुका पातळीवर शेतकरी, उत्पादक संघ, उत्पादक कंपन्यांच्या अंतर्गत एक जाळ तयार केल जाईल जेणेकरून जास्तीचा शेतीमाल दुसऱ्या गटामार्फत विक्री करता येईल किंवा कमी पडणारा शेतीमाल दुसऱ्या गटाकडून घेता येईल. हि व्यवस्था भक्कम झाली तर पुरवठा साखळी अविरतपणे सुरु राहील असे नियोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य पणन महामंडळ व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्याकडे संपर्काचा तपशील उपलब्ध असून दोन्ही यंत्रणांचा समन्वय ठेवण्यात येणार आहे. तालुका कृषी अधिकारी यांना शाश्वत स्वरुपात मागणी शहरी भागातून मिळवता येईल व मागणीप्रमाणे तालुक्यातील शेतकऱ्यांना फळे व भाजीपाला पुरवठ्याबाबत अवगत करून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)